महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) या संवर्गातील प्राचार्य (गट-अ), ज्येष्ठ अधिव्याख्याता (गट-अ), व अधिव्याख्याता (गट-ब) या पदावर कार्यरत व ५५ वर्षे पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना विभागीय परीक्षेतून सूट देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः विभाप-३३१८/प्र.क्र.६४/प्रशा-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० जून, २०१९

वाचा:- १. शा.शि.व क्री.वि., शासन अधिसूचना क्र. एसएओ-१०११/प्र.क्र.३९/प्रशा-२, दिनांक २६.०२.२०१८

२. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण),पुणे यांचे पत्र क्र.मराशैसंवप्रप/डीआयईसीपीडी/वि.प./२०१८/आस्था,दि.२५.०३.२०१९

शासन आदेश :

महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) या संवर्गातील प्राचार्य (गट-अ), ज्येष्ठ अधिव्याख्याता (गट-अ), व अधिव्याख्याता (गट-ब) या पदांसाठी विभागीय परीक्षेचे विनियमन करणारे नियम २०१८, दिनांक २६.०२.२०१८ च्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) या संवर्गातील प्राचार्य (गट-अ), ज्येष्ठ अधिव्याख्याता (गट-अ), व अधिव्याख्याता (गट-ब) या पदांवर सरळसेवेने नियुक्त अधिकाऱ्यांना सदर विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे.

२. महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) या संवर्गातील प्राचार्य (गट-अ), ज्येष्ठ अधिव्याख्याता (गट-अ) व अधिव्याख्याता (गट-ब) या पदांसाठी विभागीय परीक्षा नियम २०१८ मधील नियम ४(१)(अ) च्या परंतुकानुसार- “वयाची ५५ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीस सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.” सदर तरतुदीनुसार शिक्षण सक्षमीकरण शाखेत कार्यरत असणाऱ्या व वयाची ५५ वर्षे पूर्ण करणाऱ्या खालील कोष्ठकात नमूद अधिकाऱ्यांना विभागीय परीक्षेतून सूट देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव व पदनाम	जन्म दिनांक	५५ वर्षे पूर्ण केल्याचा दिनांक
१.	श्रीमती प्रतिभा दिलीप तायडे, प्राचार्य	३१.०८.१९६१	३१.०८.२०१६
२.	श्रीमती विद्या भाऊराव पाटील, ज्येष्ठ अधिव्याख्याता (तात्पुरते -पदोन्नत प्राचार्य)	०३.०५.१९६२	०३.०५.२०१७
३.	श्रीमती अचला विनायक जडे, ज्येष्ठ अधिव्याख्याता (तात्पुरते -पदोन्नत प्राचार्य)	१६.०४.१९६३	१६.०४.२०१८

४.	श्री.रविंद्र महादेवराव रमतकर, ज्येष्ठ अधिव्याख्याता	२७.०१.१९६४	२७.०१.२०१९
५.	श्री. शरदचंद्र आसारामजी ठेंगरे,अधिव्याख्याता (तात्पुरते पदोन्नत -ज्येष्ठ अधिव्याख्याता)	२६.०९.१९६३	२६.०९.२०१८
६.	श्रीमती रेखा विकास महाजन, अधिव्याख्याता (तात्पुरते पदोन्नत- ज्येष्ठ अधिव्याख्याता)	११.०३.१९६४	११.०३.२०१९

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१०१७०१४४३१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.06.10 17:06:48 +05'30'

(सं.ब.ममदापुरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक,महाराष्ट्र राज्य संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे
३. सर्व उपसंचालक/प्राचार्य, प्रादेशिक विद्या प्राधिकारण.
४. सर्व प्राचार्य, जिल्हा शैक्षणीक सातात्यापूर्ण व्यावसायिक विकास संघ,
५. संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती,प्रशा-२